निवडक

ROTARY CLUB OF PANVEL

रोटरीतर्फे दंतचिकित्सा शिबिर

पनवेल : चौक येथील ग्रामपंचायत ज्येष्ठ नागरिक हॉलमध्ये नुकतेच रोटरी क्लब ऑफ पनवेलतर्फे दंत तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमात डॉ. रुचा वाळींबे व एमजीएम हॉस्पीटलच्या दंतचिकित्ता विभागाचे डॉक्टर्स यांनी रुग्णांची तपासणी केली. चौक येथील जेष्ठ नागरिक, तसेच स्थानिक रहिवाशांनी सहभाग घेऊन एकूण ७५ रुग्णांनी लाभ घेतला. दंत तपासणी शिबिराचे नियोजन करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सेक्रेटरी किरण परमार, आर.टी.एन. प्रसाद कोशे, आर.टी.एन. डॉ. रुचा वाळींबे व एमजीएम हॉस्पीटलच्या दंतचिकित्सा विभागाचे डॉक्टर्स यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

एसटी प्रवासादरम्यान इसम बेपत्ता

पनवेल : पनवेल येथून खालापूर येथे जात असलेल्या बसमध्ये बसलेला इसम आपल्या राहत्या घरी न पोहोचता तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. भीमा राघू चौधरी (३१ रा. धोदाणी) असे या इसमाचे नाव असून तो रंगाने सावळा, बांधा सडपातळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे मध्यम वाढलेले, नाक सरळ, उंची ५ फूट ६ इंच, कपाळ्याच्या मध्यभागी गोंदल्याची खूण आहे. त्याला मराठी व आदिवासी भाषा अवगत आहे. त्याच्या अंगात सफेद रंगाचा चौकडी फूल बाह्याचा शर्ट व फुल जिन्स पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस हवालदार एस. एम. फाळके यांच्याशी संपर्क साधावा.

पनवेल रेल्वेस्थानकाजवळ सायकलची चोरी

पनवेल : पनवेल रेल्वेस्टेशन परिसरात उभी करून ठेवलेली सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली आहे. तीन हजार रुपये किंमतीची ही सायकल असून पनवेल स्टेशन परिसरातून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्यामुळे सुरक्षेचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

मारहाणीतील आरोपींना जामीन

पनवेल : तालुक्यातील पोयंजे येथे मारहाण केलेल्या चौघांची न्यायालयाने जामिनावर सुटका केली आहे. या चौघांनी केलेल्या मारहाणीत गावातील दोघे जण जखमी झाले होते. तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विरोधी पक्षाला मदत केल्याचा राग मनात धरून पोयंजे येथील प्रतिक व सागर पवार यांना गावातीलच प्रवीण चोरघे, गुलशन चोरघे, सुजित जाधव, सुरज चोरघे यांनी दमदाटी व मारहाण करून जखमी केले. आरोपींनी दोघांच्या हातावर, पाठीवर व गुडघ्यावर मारहाण करत जखमी केले.

आरोपींना न्यायालयीन कोठडी

पनवेल : तालुक्यातील नांदगाव येथे ३५ वर्षीय किरण खुटले यांच्यावर खुनाचा प्रयत्न करणाऱ्या संजय पाटील या एका आरोपीला शहर पोलिसांनी अटक केली असून त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील दुसरा आरोपी दिनेश पाटील (नांदगाव) फरारी आहे. किरण खुटले यांच्यावर आरोपी यांनी काचेच्या बाटलीच्या सहाय्याने वार करत त्यांना जखमी केले होते.

उरणमध्ये महारक्तदान शिबिर

उरण : नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त उरण शहरात एन. आय. हायस्कूल व पिरकोन जिल्हा परिषद शाळा येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन जेएनपीटीचे ट्रस्टी दिनेश पाटील व उपसभापती वैशाली पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार मनोहर भोईर, नगराध्यक्षा सायली सविन म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविंद्र कोळी, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, रवी वाजेकर, नगरसेविका यास्मिन गॅस, रमेश ठाकूर, डॉ. मनोज भद्रे, माजी सरपंच सोनारी महेश, एन. आय. हायस्कूल चेअरमन महेश म्हात्रे, जि. परिषद सदस्य विजय भोईर, सरपंच पागोटे भार्गव पाटील, माजी उपसभापती महादेव बंडा आदी मान्यवर उपस्थित होते.

पनवेल, उरण परिसरात स्वच्छतेचा जागर

उरण पालिकेच्या वतीने स्वच्छता अभियान

स्वच्छ उरण, सुंदर उरण
हरित उरण, सुंदर उरण
स्वच्छ उरण, सुंदर उरण
हरित उरण, सुंदर उरण

उरण : वार्ताहर–

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधत उरण नगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या वेळी नगराध्यक्षा सायली सविन म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविंद्र कोळी, शिक्षण सभापती व गटनेते रवी भोईर, नगरसेवक तथा भाजपा शहराध्यक्ष कौशिक शहा, मुख्याधिकारी अवधुत तावडे, सभापती सर्वश्री यास्मिन गॅस, प्रियंका पाटील, दमयंती म्हात्रे, नंदकुमार लांबे, नगरसेवक मेराज शेख, तुषार ठाकूर, नगरसेविका रजनी कोळी, जान्हवी पंडित, प्रभारी कार्यालय निरीक्षक राठोड, प्रभारी आरोग्य निरीक्षक महेश लवटे, वसुली विभाग प्रमुख धोत्रे, न्याय व विधी विभाग प्रमुख कदम, पाणीपुरवठा विभागचे जगदीश म्हात्रे, संजय पवार, विजय पवार व इतर कर्मचारी उपस्थित होते.

नवी मुंबई भाजपतर्फे स्वच्छता सेवा संवाद पदयात्रा

नवी मुंबई : बातमीदार–

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून बेलापूर विधानसभेच्या आ. मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून नवी मुंबई भारतीय जनता पार्टीच्या वतीने वाशी येथे महात्मा गांधी स्वच्छता सेवा संवाद पदयात्रा काढण्यात आली. सदर पदयात्रा वाशी मिनी सी–शोर ते सेक्टर–९ वाशीपर्यंतचा परिसर स्वच्छता करीत काढण्यात आली. या वेळी बेलापूर विधानसभेच्या आ. म्हात्रे, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, भाजप नवी मुंबई प्रभारी संजय उपाध्याय, महिला मोर्चा अध्यक्षा दुर्गा ढोक, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, नीलेश म्हात्रे, राजू तिकोणे उपस्थित होते.

या वेळी आमदार म्हात्रे यांनी सांगितले की, जात, पात, धर्म, पंथ, प्रांत, पक्ष अशा सर्वांच्या वर असलेले राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य असून जगाला सत्य व अहिंसेचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ही स्वच्छता संवाद पदयात्रा काढण्यात आलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान ही लोकचळवळ सुरू केली. देशात ९ कोटी शौचालय बांधत सुमारे ५ लाख गावे हागणदारीमुक्त केली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने संपूर्ण महाराष्ट्र हागणदारीमुक्त करीत स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहचविला. आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वप्न साकार होत असल्याने त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना नमन करीत असल्याचे आ. म्हात्रे यांनी सांगितले. आज महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून माझ्या बेलापूर विधानसभा क्षेत्रात महात्मा गांधी स्वच्छता सेवा संवाद पदयात्रा काढून स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी हा उद्देश असल्याचे आ. म्हात्रे यांनी सांगितले.

Swachh Bharat Abhiyan

STOP
Abhiyan
Swachh Bharat Abhiyan

कालसेकर महाविद्यालयाद्वारे ‘स्वच्छ भारत अभियान’

पनवेल : रामप्रहर वृत्त–

अंजुमन–ए–इस्लाम या प्रथितयश संस्थेच्या अब्दुल रझ्झाक कालसेकर पॉलिटेक्निक व कालसेकर टेक्निकल कॅम्पस, पनवेल आणि पनवेल महानगरपालिका व रोटरी क्लब पनवेल, यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच पनवेल शहरात ‘स्वच्छ भारत अभियान’ आयोजित करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जुने पनवेल येथे या अभियानाची सुरुवात केली गेली. १०० विद्यार्थी व ५० शिक्षक, तर ५० शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांनी या अभियानात पुढाकार घेऊन श्रमदान केले. डॉ. आंबेडकर पुतळ्यापासून पनवेल रेल्वेस्थानका दरम्यानचा परिसर कालसेकर महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छ केला.

पनवेल मनपा महिला बालकल्याण सभापती दर्शना भोईर, नगरसेवक राजू सोनी, रोटरॅक्ट अध्यक्ष ए. सी. म्हात्रे व सौ. म्हात्रे, मनपा आरोग्य अधिकारी, शैलेंद्र गायकवाड, पर्यवेक्षक संजय जाधव आदी मान्यवर या अभियानादरम्यान उपस्थित होते.

अंजुमन–ए–इस्लाम, नवी मुंबई शिक्षण संस्थांचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन श्री. बुरहान हारिस यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्वच्छता अभियानास कालसेकर टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. अब्दुल रझ्झाक होनुटगी, कालसेकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. रमजान खाटीक, फार्मसी महाविद्यालयाचे डीन डॉ. शारीक उपस्थित होते. या स्वच्छ भारत अभियानाच्या यशस्वितेसाठी समन्वयक प्रा. अबू सुफियान, प्रा. बंदे नवाज, कालसेकर टेक्निकल कॅम्पसचे एनएसएस प्रमुख डॉ. असीफ गांधी व कालसेकर पॉलिटेक्निक एनएसएस प्रमुख प्रा. झहीर खतीब यांनी विशेष परिश्रम घेतले.

आश्रय सोशल फाउंडेशनतर्फे स्वच्छ भारत अभियान

ASHRAY SOCIAL FOUNDATION
SWACHA BHART ABHIYAN
लोकपरिषद

पनवेल : प्रतिनिधी–

आश्रय सोशल फाउंडेशनने राबवले आगळ्या वेगळ्या पद्धतीने स्वच्छ भारत अभियान. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छ भारत अभियान जाहीर केले. या अभियानात भाग घेताना पनवेलमधील आश्रय सोशल फाउंडेशनने एड्स निर्मूलन करून भारत स्वच्छ करण्याचा संदेश या अभियानात महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी दिला.

महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबरपासून स्वच्छ भारत अभियान राबविण्याचा संदेश दिला. पनवेलमधील आश्रय सोशल फाउंडेशनचे संस्थापक अशोक गायकवाड आणि पर्यवेक्षक मनीषा अहिवले यांनी शहरातील कचरा साफ करून परिसर स्वच्छ करीत असताना प्रत्येक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असतो हे लक्षात आल्याने आणि तरुण पिढीत एड्सचा वेगाने होणारा प्रसार रोखण्यासाठी त्या दिवशी महाविद्यालयात जाऊन एड्सबाबत जनजागृती मोहीम राबवून आगळ्या वेगळ्या पद्धतीने स्वच्छ भारत अभियान राबवले.

आश्रय सोशल फाउंडेशनने हे कार्य करीत असतानाच आदर्श समूहाच्या देवद येथील विसपुते संकुलापासून पनवेल रेल्वे स्टेशनपर्यंत निघालेल्या स्वच्छता रॅलीमध्ये विद्यार्थ्यांबरोबर भाग घेऊन स्वच्छता मोहीमही राबवली. यामध्ये आश्रय फाउंडेशनच्या ऊर्मिला यादव, मनीषा अहिवले, शिल्पा हलनकर, संजीवनी सावंत, साधना जाधव, स्वाती कांबळे, संजना तांबे, जयश्री जाधव, अश्विनी लोंढे, दीक्षा गावंड आणि करण निकम आणि महाविद्यालयाचे ४०० विद्यार्थी सामील झाले होते.

पनवेलमध्ये ३६० किलो प्लॅस्टिक पिशव्या जप्त

खारघर : प्रतिनिधी–

पनवेल परिसरात बुधवारी महापालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संयुक्त कारवाईत सुमारे ३६० किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले आहे.

पालिकेचे मुख्यालय असलेल्या पनवेल शहरात कोळीवाडा परिसरात प्लॅस्टिकच्या फॅक्टरीवर धाड टाकण्यात आली आहे. पनवेल महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ही कारवाई करण्यात आली. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी उमेश यादव आणि प्रभाग अधिकारी श्रीराम हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली या पिशव्या बनविण्याच्या कारखान्यावर धाड टाकण्यात आली. या कारवाईत ३६० किलोच्या प्लॅस्टिक सदृश पिशव्या जप्त करण्यात आल्या. या दुकानचालकास ५ हजार रुपयांचा दंड केला असून या कारखान्याला सिल करण्यात आले आहे.

पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला शौचालय सुरू करा

पनवेल : प्रतिनिधी–

पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला म्हणजेच नवीन पनवेलकडे शौचालयाची सोय नसल्याने ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि महिलांची कुचंबणा होत असल्याने त्या बाजूला शौचालय बांधण्याची मागणी अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाने पनवेल स्टेशन प्रबंधकांना निवेदन देऊन केली आहे.

पनवेल रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला नवीन पनवेलकडे मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढत आहे. या बाजूने रोज हजारो नागरिक रेल्वे स्टेशनला येत असतात. लोकल आणि मेल गाड्यांतून येणारे प्रवासी नवीन पनवेलच्या बाजूला जातात. या बाजूला रेल्वेने शौचालय बांधलेले नसल्याने अनेक तास प्रवास करून आलेल्या ज्येष्ठ नागरिक आणि महिलांची अडचण होते. यामध्ये अनेक रुग्णही असतात. अनेक तरुण नाईलाजाने ज्येष्ठ नागरिक कट्ट्याच्या बाजूच्या भिंतीजवळच आपला कार्यभाग उरकतात. त्यामुळे त्या भागात दुर्गंधी पसरली आहे. त्याच्या जवळच फेरीवाले भाजी आणि खाद्यपदार्थ विकत आसतात. त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

त्यामुळे अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे आणि त्यांचे सहकारी मदन नेरकर, साहेबराव जाधव, ईश्वरदास थुल, सोनावणे, कांबळे, पाटील आणि सावळेकर यांनी बुधवारी सकाळी पनवेल स्टेशन प्रबंधक करंदीकर यांची भेट घेऊन सिडकोचे नवीन पनवेलमध्ये असलेले शौचालय स्टेशनपासून लांब असून ते बहुतेक बंदच असते यासाठी स्टेशनचे नवीन बांधकाम पूर्ण होण्याची वाट न पाहता रेल्वेने महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी नवीन पनवेल बाजूला शौचालयाची सोय करण्याची मागणी केली. याशिवाय बुकिंग कार्यालयाजवळ इंडिकेटर लावण्याची मागणी केली होती त्याचे काय झाले याची चौकशी केली असता त्याला मंजुरी मिळाली असून आठवडाभरात ते सुरू होतील, अशी माहिती या वेळी स्टेशन प्रबंधक करंदीकर यांनी दिली.

नगरसेवक राजू सोनी यांनी स्वखर्चाने ड्रेनेजच्या चेंबरवरील झाकणे बदलली

पनवेल : प्रतिनिधी–

पनवेल महानगरपालिकेचे कार्यसम्राट नगरसेवक, तसेच प्रभाग समितीचे अध्यक्ष राजू सोनी यांनी प्रभु आळी परिसरात दयनीय अवस्था झालेल्या ड्रेनेजच्या चेंबरची झाकणे स्वखर्चाने बदलली. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत झाला आहे.

प्रभु आळी येथील रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या ड्रेनेजच्या चेंबरवरील आतील रिंगा तुटून वरील झाकण खूप दिवसापासून रस्त्याच्या खाली गेले होते. त्यामुळे पादचारी, तसेच वाहनचालकांना वाहन चालविताना मोठा त्रास होत होता. यासंदर्भात नगरसेवक व प्रभाग समितीचे अध्यक्ष राजू सोनी यांना ही समस्या कळताच तातडीने त्यांनी स्वतः कडे कामगार कामाला लावून येथील स्वखर्चाने चेंबरची झाकणे बदलून टाकली व रस्ता सुरळीत करून दिला. याबद्दल परिसरातील रहिवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत.

पोषण आहारावर वाकडी येथे कार्यशाळा

पनवेल : रामप्रहर वृत्त–

बालविकास फाउंडेशन व कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन संचालित आणासाहेब सहस्त्रबुद्धे आश्रमशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पोषण आहारावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत डॉ. संदीप राजपूत यांनी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. या वेळी प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अनिरुद्ध आदमाने सर यांनी केले. फाउंडेशनचे अध्यक्ष एन. डी. खान, डॉ. इंदिरा चव्हाण, समाजसेविका चित्रा भगत, अधीक्षक श्री. शेख, फाउंडेशन व रायल एज्युकेशनच्या सचिव सलमा खान, असिफ शेख व शिक्षकवृंदांसह मोठ्या प्रमाणात आश्रमशाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून आश्रम शाळेचे शिक्षक श्री. केणी सर यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल फाउंडेशनच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजश्री पाटील यांनी केले.